(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XIII / Issue – III ISSN 2277-8063

# भारतीय राज्यघटनेतील संविधानदुरुस्तीचे कलम ३६८ एक दृष्टीक्षेप

**प्रा. आकाश विलास जाधव** (एम.ए., सेट, राज्यशास्त्र) सहाय्यक प्राध्यापक, क्रांतिसिंह नाना पाटील कॉलेज, वाळवा

ई.मेल.आयडी. akashvjadhav5050@gmail.comमो.नं.९६६५४९६४६८

---

**गोषवारा**

भारतीय राज्यघटना जगातील सर्वांत विस्तृत लिखित राज्यघटनांपैकी एक आहे. या राज्यघटनेमध्ये संविधान दुरुस्तीची प्रक्रिया कलम ३६८ अंतर्गत नमूद केली आहे, ज्याद्वारे संसदेवर ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे. संविधानाचा मसुदा तयार करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी यासाठी लवचिक आणि मजबूत पद्धतीची मांडणी केली होती. संसद घटनादुरुस्ती करू शकते, मात्र सर्वोच्च न्यायालयाने केशवानंद भारती खटल्यात संविधानाच्या मूलभूत संरचनेत बदल करण्यावर काही मर्यादा घातल्या आहेत. घटनादुरुस्ती तीन प्रकारांनी केली जाते: साध्या बहुमताने, विशेष बहुमताने, आणि विशेष बहुमत व राज्यांच्या संमतीने. साध्या बहुमताने राज्यघटनेतील सरहद्दी किंवा इतर सामान्य बाबी बदलल्या जातात. विशेष बहुमताने अधिक महत्त्वाच्या तरतुदी जसे की मूलभूत अधिकारांमध्ये बदल केले जातात. तर, राज्यांच्या संमतीने केंद्र-राज्य संबंधांशी संबंधित दुरुस्ती केली जाते. भारतीय संविधानाच्या मूलभूत संरचनेत लोकशाही, संघराज्यीय स्वरूप, न्यायालयीन पुनर्विलोकन, आणि व्यक्तिगत स्वातंत्र्य यांचा समावेश होतो. घटनादुरुस्ती प्रक्रियेबद्दल अनेक खटले झाले आहेत, जसे की शंकरी प्रसाद, गोलकनाथ, आणि केशवानंद भारती, ज्यामुळे संविधान दुरुस्तीचे अधिकार व मर्यादा स्पष्ट झाल्या आहेत. घटनादुरुस्तीची प्रक्रिया लवचिक असून, केशवानंद भारती खटल्याने संविधानाच्या मूलभूत संरचनेचे संरक्षण करण्यात आले आहे.

**कीवर्ड:** भारतीय राज्यघटना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, घटना दुरुस्तीचे कलम ३६८, केशवानंद भारती खटला.

## प्रस्तावना

जगभरात वेगवेगळ्या स्वरूपात राज्यघटना आहेत काही देशात लिखित स्वरूपात तर काही देशात अलिखित स्वरूपाची राज्यघटना आहेत. अमेरिका या देशाची जगातील सर्वात प्रथम लिखित व लहान स्वरूपाची राज्यघटना आहे तसेच इंग्लंड या देशाची वंशपरंपरागत चालत आलेली अलिखित स्वरूपाची राज्यघटना आहे.

भारतीय राज्यघटना जगातील सर्वात विस्तृत व लिखित राज्यघटनांपैकी एक आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखालील असलेल्या मसुदा समितीने २ वर्षे ११ महिने १८ दिवस एवढ्या कालावधीमध्ये भारतीय राज्यघटनेचा मसुदा तयार केला. भारतीय राज्यघटनेतील घटनादुरुस्तीची प्रक्रिया भाग २० व कलम ३६८ मध्ये सांगितलेले आहे. ब्रिटनमधील घटनादुरुस्तीची प्रक्रिया सोपी आहे व अमेरिकेतील घटनादुरुस्तीची प्रक्रिया ताठर आहे. भारतीय राज्यघटना अगदी लवचिक व अगदी ताठर नसून ती दोघांचे मिश्रण आहे. कलम ३६८ (१) नुसार घटनादुरुस्तीची शक्ती ही संसदेची संविधानिक शक्ती आहे. संसद घटनेतील कोणत्याही तरतुदीमध्ये बदल करू शकते, भर घालू शकते किंवा एखादी तरतूद काढून टाकू शकते, मात्र संसदेला मूलभूत चौकटीत बदल करता येणार नाही. असे सर्वोच्च न्यायालयाने केशवानंद भारती खटल्यात नमूद केले आहे.

## घटनादुरुस्ती कलम ३६८ बाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत

घटना परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी असे प्रतिपादन केले की, "आम्हाला अमेरिका किंवा ऑस्ट्रेलियासारख्या अतिशय कठीण व लोकविलक्षण अशा दुरुस्तीच्या अटी ठेवावयाच्या नाहीत. कारण त्यामुळे घटनादुरुस्ती करणे जवळपास अशक्य होईल. तसेच आमची घटना पूर्णतः निर्दोष, बिनचूक आणि परिपूर्ण आहे, असेही आम्हास म्हणावयाचे नाही. आमची घटना जास्तीत जास्त लोकाभिमुख आणि परिस्थितीसापेक्ष असावी हाच आमचा उद्देश आहे. घटना लोकांच्या भावनेस बळी पडून राष्ट्राचे व लोकांचे नुकसान होऊ नये हीच आमची अपेक्षा आहे." (घांगरेकर, १०२)

## राज्यघटनेच्या दुरुस्तीच्या प्रक्रियेचे तीन मार्ग

### १) साध्या बहुमत पद्धतीने होणारी घटनादुरुस्ती:-

घटनादुरुस्ती विधेयक संसदेच्या कोणत्याही सभागृहात मांडण्यात येते. प्रत्येक सभागृहाने उपस्थित सभासदांच्या बहुमताने घटनादुरुस्ती विधेयक समंत केले आणि त्या विधेयकाला राष्ट्रपतीची समंती प्राप्त झाली, तर घटनादुरुस्ती फक्त खालील तुलनात्मकदृष्ट्या कमी महत्त्वाच्या बाबींसाठीच करता येते.

i) घटकराज्यांची नावे, सरहद्दी अगर प्रदेश बदलविणे; नवीन घटकराज्ये निर्माण करणे. (कलम ३, ४)

ii) घटकराज्यातील विधानपरिषद नाहीशी करणे अगर निर्माण करणे.(कलम १६९)

iii) नागरिकत्वासंबंधीचे कायदे करणे, नागरिकत्व देणे व काढून घेणे.(कलम५ ते ११)

iv) केंद्र आणि घटकराज्य सरकारचे अधिकृत भाषा ठरविणे.(कलम ३४३, ३४५)

v) संसदेची गणसंख्या ठरविणे. [कलम १००(३)]

vi) संसद सदस्यांचे वेतन आणि भत्ते ठरविणे. (कलम १०६)

vii) संसद सदस्यांचे विशेष अधिकार ठरविणे. [कलम १०५ (३)]

viii) सर्वोच्च न्यायालयातील इतर न्यायाधीशांची संख्या ठरवणे. [कलम १२४(१)]

(घांगरेकर, ९९,१००)

वरील बाबींसाठी भारतीय राज्यघटनेत साध्या बहुमताने संसदेत घटनादुरुस्ती विधेयके संमत केली जातात. परंतु जर लोकसभा व राज्यसभा यांच्यात मतभेद झाले तर संयुक्त बैठकीची तरतूद नाही. जेव्हा विधेयके संसदेत संमत होऊन राष्ट्रपतीच्या स्वाक्षरीसाठी जातात. राष्ट्रपतींनी त्या विधेयकास संमती दिल्यास ते कायद्यात रूपांतर होते.

**२) संसदेच्या विशेष बहुमताने होणारी घटनादुरुस्ती:-**

घटनादुरुस्तीचा ठराव संसदेच्या कोणत्याही सभागृहात मांडण्यात येतो. तो ठराव संसदेच्या प्रत्येक सभागृहाने -i) उपस्थित आणि मतदान करणाऱ्या सभासदांच्या दोन तृतीयांश बहुमताने आणि ii) प्रत्येक सभागृहाच्या एकूण सभासदसंख्येच्या बहुमताने संमत केला आणि त्याला राष्ट्रपतीची अनुमती प्राप्त झाली की संविधानदुरुस्ती होते.

घटनेतील बरचसा भाग हया दुरुस्तीप्रक्रियेद्वारे संशोधित होतो. घटनादुरुस्ती प्रक्रिया क्रमांक एक आणि तीन ह्या गटात मोडणाऱ्या तरतुदी सोडून इतर सर्व बाबतीत घटना दुरुस्ती करावयाची असल्यास ती याच मार्गाने करावी लागते. उदा. मूलभूत अधिकार आणि राजनीतीची मार्गदर्शक तत्वे यामध्ये वरील मार्गानेच घटनादुरुस्ती होते. (घांगरेकर, १००, १०१)

वरीलप्रमाणे संसदेच्या कोणत्याही सभागृहात प्रथम विधेयक मांडून विशेष बहुमताने विधेयक पारित होते. तसेच पुढे राष्ट्रपतीच्या स्वाक्षरीस जाते. राष्ट्रपतींनी समंती दिल्यास विधेयकाचे कायद्यात रूपांतर होते.

**३) संसदेच्या विशिष्ट बहुमताने आणि निम्म्याहून कमी नाही इतक्या घटकराज्यांच्या कायदेमंडळाच्या संमतीने होणारी घटनादुरुस्ती:-**

काही विशिष्ट तरतुदींच्या बाबतीत संसदेच्या दोन्ही सभागृहांनी प्रत्येक सभागृहाच्या एकूण सभासद संख्येच्या बहुमताने आणि हजर राहून मतदान करणाऱ्या सभासद संख्येच्या दोन तृतीयांश बहुमताने तो मान्य केल्यानंतर त्या विधेयकाला घटकराज्यांपैकी निम्म्यापेक्षा कमी नाही, इतक्या घटकराज्यांच्या कायदेमंडळनी मान्यता दिल्याशिवाय आणि राष्ट्रपतींनी मान्यता दिल्याशिवाय घटनादुरुस्ती होऊ शकणार नाही, असे बंधन घालण्यात आले आहे. घटकराज्यांच्या हक्कासंबंधीच्या आणि केंद्र व घटक राज्ये यांच्यातील परस्परसंबंधाच्या ज्या तरतुदी केलेल्या आहेत त्यांच्या बाबतीत अशा पद्धतीने घटनादुरुस्ती करावी लागणार आहे. उदा. राष्ट्रपतीची निवडणूक (कलम ५४, ५५), मध्यवर्ती सरकारचे कार्यक्षेत्र(कलम ७३), घटक राज्यांचे अधिकार क्षेत्र (कलम १६२), न्यायमंडळ (भाग ५ प्रकरण ४), केंद्र व घटक राज्ये यांच्यातील विषय विभागणी(७वे परिशिष्ट), संसदेतील घटकराज्यांना दिलेल्या प्रतिनिधित्वाबाबतच्या तरतुदी (कलम ८०, ८१), घटनादुरुस्ती विषयक तरतूद (कलम ३६८). (गोखले, ४८)

वरील घटनादुरुस्तीच्या प्रक्रियेमध्ये संसदेच्या दोन्ही सभागृहाप्रमाणेच भारतातील घटकराज्यांना सुद्धा महत्त्वाचे स्थान दिलेले दिसून येते. तसेच राष्ट्रपतींच्या समंतीची असणारी भूमिका याला सुद्धा महत्त्व दिलेले दिसून येते.

**घटनादुरुस्ती संबंधी न्यायालयीन खटले व दुरुस्त्या:-**

**१) शंकरी प्रसाद विरुद्ध भारत सरकार खटला (१९५१):-**

भारतामध्ये पहिली घटना दुरुस्ती १९५१ साली झाली. तेव्हापासूनच घटनेचे ३६८ वे कलम बरेच वादाचे ठरले. पहिल्या घटनादुरुस्तीने संपत्तीच्या अधिकारांचा संकोच केला. या खटल्यामध्ये १३ वे कलम घटनात्मक कायद्याला लागू पडत नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले. विधायकी सत्ता आणि घटनात्मक सत्ता वेगळया आहेत असा निर्णय न्यायमूर्ती पातंजली शास्त्री यांच्या खंडपीठाने दिला. (घांगरेकर, १०२, १०३)

संसद घटनादुरुस्ती करून मूलभूत हक्कात बदल करू शकते. कलम १३ मधील कायदा शब्दात केवळ साधारण कायदे येतात. घटनादुरुस्ती कायद्यांचा समावेश त्यात होत नाही, असे वरील खटल्यातून नमूद होते.

**२) गोलकनाथ विरुद्ध पंजाब राज्य खटला (१९६७):-**

शंकरी प्रसाद खटल्यातील निर्णय सर्वोच्च न्यायालयाने या खटल्यात बदलून असे मत प्रकट केले की, नागरिकांना जे मूलभूत अधिकार घटनेनुसार प्राप्त झाले. त्यांचा संकोच करणारा किंवा अधिकार नष्ट करणारा कायदा संसदेला करता येणार नाही. (घांगरेकर, १०३)

मूलभूत हक्क अलौकिक व अरूपांतरणीय आहेत. संसद हे हक्क कमी किंवा हिरावून घेऊ शकत नाही, असे या खटल्यात नमूद केलेले दिसून येते. यावरून नागरिकांना जे दिलेले घटनेने मूलभूत अधिकारांचे एक प्रकारे संरक्षण सर्वोच्च न्यायालयाकडून केलेले दिसून येते.

**३) २४ वी घटनादुरुस्ती कायदा (१९७१):-**

गोलकनाथ निवाड्याने संसदेला मूलभूत हक्कांचा संक्षेप वा भंग करण्याचा अधिकार नाकारला होता. तो संसदेला परत मिळवून देणे हा या दुरुस्तीचा हेतू होता. १३(२) अनुच्छेदाने घातलेली मर्यादा संविधान दुरुस्ती विधेयकाला लागू राहणार नाही, राष्ट्रपतीकडे स्वाक्षरीसाठी पाठवलेल्या दुरुस्ती विधेयकावर राष्ट्रपतीला स्वाक्षरी करावीच लागेल अशा तरतुदी या दुरुस्तीत केल्या.(भोळे, २६७)

संसदेला कायदा करून कोणत्या मूलभूत हक्कात बदल करण्याचा किंवा काढून घेण्याचा अधिकार आहे. हे या घटनादुरुस्तीरद्वारे स्पष्ट केलेले हे दिसून येते.

**४) केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य खटला (१९७३)**

केशवानंद भारती हे भारतातील केरळमधील एडनीर मठ या हिंदू धार्मिक संस्थेचे प्रमुख होते. १९७० मध्ये केरळ सरकारने धार्मिक संस्थांच्या मालकीच्या जमिनीवर निर्बंध लादले. श्री केशवानंद भारतीच्या अध्यक्षतेखालील एडनीर मठाने या कायद्याच्या घटनात्मकतेला केरळ उच्च न्यायालयात आव्हान दिले अखेर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले आणि त्यांनी राज्य सरकारच्या बाजूने निकाल दिला.

भारताच्या संसदेने यादरम्यान २४ वी घटनादुरुस्ती समंत केली, ज्याने न्यायपालिकेच्या अधिकारांना कमी करण्याचा आणि न्यायिक पुनर्विलोकनाची व्याप्ती मर्यादित करण्याचा प्रयत्न केला. २५ वी आणि २९ वी घटनादुरुस्ती देखील समंत करण्यात आली, ज्यात नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवर मर्यादा घालण्याचा आणि संविधानाच्या कोणत्याही भागामध्ये दुरुस्ती करण्याचा अधिकार संसदेला देण्याचा प्रयत्न केला गेला. केशवानंद भारतीयांनी या सुधारणांच्या वैधतेला आव्हान देणारी याचिका दाखल केली आणि त्यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी संविधानाचा मूलभूत रचनेचे उल्लंघन केले आहे. तसेच राज्यघटनेच्या मूलभूत चौकटीला धक्का बसतो. यामुळे केशवानंद भारती (ज्यांना 'द मौंक हू सेव्हड इंडियन कॉन्स्टिट्यूशन' म्हणून संबोधले जाते) यांनी प्रसिद्ध घटनातज्ञ नाना पालखीवाला यांच्यामार्फत सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. ऐतिहासिक निर्णय झाला. ज्याने मूलभूत संरचनेच्या सिद्धांताचे समर्थन केले आणि संविधानात सुधारणा करण्याच्या संसदेच्या अधिकारावर मर्यादा घातला घातल्या. (गोखले, ७२)

**मूलभूत संरचनेचे तत्व**

घटनेत कुठेही उल्लेख नसलेल्या 'मूलभूत संरचना (चौकट)' चा जन्म या निकालामुळे झाला. सर्वोच्च न्यायालयाच्या १३ सदस्यीय घटनापीठापुढे तब्बल ६८ दिवस या खटल्यावर युक्तिवाद सुरू होते. न्यायालयाने २४ एप्रिल १९७३ रोजी सात विरुद्ध सहा अशा बहुमताने तब्बल ७०० पानी ऐतिहासिक निकाल दिला. घटनेमध्ये बदल करण्याचे संसदेचे अधिकार अनिर्बंध नाहीत आणि कोणत्याही परिस्थितीत घटनेची मूलभूत चौकट, घटनेचे सर्वोच्च स्थान, केंद्र- राज्य सरकार यांचे स्वतंत्र अधिकार, घटनेचे सार्वभौम आणि लोकशाही स्वरूप, धर्मनिरपेक्षता या तत्त्वांना हात लावता येणार नाही, असे या निकालात स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते. बहुमताने निकाल देणाऱ्यामध्ये सरन्यायाधीश एस. एम. सिक्री, न्या. हेगडे, न्या. शेलार, न्या. ग्रोवर, न्या. जगमोहन रेड्डी आणि न्या. एच. आर. खन्ना यांचा समावेश होता. तर विरोधात निकाल देणाऱ्यांमध्ये न्या. अजिनाथ रे, न्या. पालेकर, न्या. मॅथ्यू, न्या. बेग, न्या. द्विवेदी, न्या. वाय. व्ही. चंद्रचूड यांचा समावेश होता. अर्थात या निकालावर टीका देखील बरीच झाली. न्यायव्यवस्थेचा संसदेच्या अधिकारांमध्ये वाढता हस्तक्षेप हा त्यातील प्रमुख आक्षेप होता. (दै. लोकसत्ता २४/०४/२०२४/ पान. ६)

या सिद्धांताने घटनादुरुस्ती करण्याच्या संसदेच्या अधिकारावर नियंत्रण ठेवण्याचे काम केले आहे आणि हे सुनिश्चित केले आहे, की संविधान हे एक जिवंत दस्तऐवज आहे जे आपली मूलभूत मूल्ये आणि तत्वे जपत बदलत्या काळाला प्रतिसाद देते.

**४२ वी घटना दुरुस्ती १९७६ एक लघु राज्यघटना**

ही एक वादग्रस्त घटना दुरुस्ती होती. वरील निकालाचाच परिपाक होती.जी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या काळात झाली.या घटना दुरुस्तीने प्रस्तावनेमध्ये समाजवादी, धर्मनिरपेक्षता, एकात्मता हे शब्द नव्याने घालण्यात आले.तसेच १४ अ नवीन अनुच्छेद समाविष्ट केले ज्याद्वारे संसदेला कायदा करून प्रशासकीय न्यायमंडळे संघ आणि राज्य यांच्याकरिता स्थापन करता येतील. याद्वारे सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाचे अधिकार काढून घेण्यात आले. मूलभूत अधिकारांवर मर्यादा आणली गेली. कलम ५१ अ हे नव्याने समाविष्ट करून त्यात नागरिकांच्या १० मूलभूत कर्तव्यांचा समावेश केला. संसदेचा कालावधी सहा वर्षांचा केला इत्यादी (गोखले, ७०-७९). या घटनादुरुस्तीने संसदेला अमर्याद घटनादुरुस्तीचे अधिकार मिळाल्याचे दिसून येतात.

**मिनर्व्हा मिल्स वि. युनियन ऑफ इंडिया खटला १९८०:-**

या खटल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने कलम ३६८ (४) रद्द केले. त्यामध्ये ४२ व्या घटनादुरुस्तीने नव्याने काही तरतुदी करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये मूलभूत अधिकार आणि मार्गदर्शक तत्वे यांना प्राधान्य देण्यासाठी कलम ३१ क मध्ये सुधारणा केली होती. ते रद्द केले आणि मूलभूत संरचने तत्व लागू करून केशवानंद भारती खटल्याचा निर्णय या खटल्यामध्ये पुनर्विचार केला. घटनादुरुस्तीचा संसदेचा अधिकार मर्यादित असल्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला. (कश्यप, ६१)

संसदेला जरी घटनादुरुस्तीचा अधिकार असला तरी त्यांना मूलभूत संरचनेच्या अधीन राहूनच घटनादुरुस्ती करता येईल तसेच ते मर्यादित स्वरूपात असेल असे वरील खटल्यावर दिसून येते. भारतीय राज्यघटना मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्वे यांच्या संतुलनावर आधारलेली आहे. असे या खटल्यातून नमूद होते.

**लोकशाही देशात संविधानाचे महत्त्व**

संविधान हा लोकशाहीचा पाया आहे. सध्याच्या युगात सर्वच राजकारणी व्यक्ती एकाच उद्देशाचे असतीलच असे नाही, राजकीय नेते स्वार्था पोटी जेव्हा जनतेकडून निवडून संसदेत जातील तेव्हा ते संविधानात आपल्याला हवे असतील तसे बदल करून घेण्याचा प्रयत्न करतील, तसेच एक प्रकारे देशात केंद्रीकरण व्यवस्था (हुकूमशाही) दिसून येऊ शकते. जेणेकरून लोकशाहीकडून देशाची हुकूमशाहीकडे वाटचाल सुरू होण्यास वेळ लागणार नाही. जर सातत्याने जागरूक राहणारी जनता आणि सक्षम न्यायसंस्था असेल तर देशात लोकशाही व्यवस्था टिकून राहील आणि संविधानानुसार देश चालेल.

**निष्कर्ष**

घटना दुरुस्तीचे कलम ३६८ एक भारतीय संविधानाच्या परिवर्तनशील स्वभावाचे प्रतीक आहे. या कलमानुसार राज्यघटनेत आवश्यक त्या सुधारणा करता येतात. परंतु त्याचवेळी न्यायपालिका ही राज्यघटनेच्या संरचनेचे रक्षण करण्याचे कार्य करते. तसेच सर्वोच्च न्यायालयास न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार आहे. संविधानाचे हे लवचिकतेचे व स्थिरतेचे मिश्रण भारताच्या लोकशाही व्यवस्थेला सुदृढ करते.

१९५० पासून आजतागायत सप्टेंबर २०२४ पर्यंत संपूर्ण भारतीय राज्यघटनेमध्ये एकूण १०६ घटनादुरुस्त्या करण्यात आल्या आहेत. कलम ३६८ दुरुस्ती प्रक्रियेमुळे संविधान लवचिक आणि बदलत्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय गरजा नुसार अद्यावत ठेवता येते. जरी घटनादुरुस्तीने संविधानात काही बदल करता येत असले तरी संविधानाची मूलभूत संरचना गाभा (चौकट) बदलता येत नाही.

**संदर्भ:**

Modern Language Association (MLA) Style

घांगरेकर, चिं. ग. *भारतीय राज्यघटना स्वरूप आणि राजकारण*. चतुर्थ आवृत्ती., श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९८९

गोखले, आर. एम. *भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण १*, द्वितीय आवृत्ती., कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७८.

भोळे, भास्कर लक्ष्मण. *भारतीय संविधान - सिद्धांत आणि व्यवहार*, पहिली आवृत्ती., महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९८७.

कश्यप, सुभाष सी. अनुवाद पाटील, न. ब. *आपली संसद*, पहिली आवृत्ती., नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, २००६.

दै. लोकसत्ता, *घटनेच्या चौकटीची मोडतोड होऊ शकते?*, २४/०४/२०२४, पान ६.